जावक क्रं.३०२६/२०१८
कोरेगाव पार्क पो. स्टे. पुणे
दि.३०/०५/२०१८

# प्रेस नोट दि. २९/०५/२०१८

| | | |
|---|---|---|
| १ | पोलीस ठाणे | कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन, पुणे |
| २ | जिल्हा | पुणे शहर |
| ३ | अन्वेषण अधिकारी | व्ही. बी. राऊत, म. पोलीस उप-निरीक्षक, कोरेगाव पार्क पो.स्टे. पुणे |
| ४ | तक्रारदाराचे नाव | दिपाली हेमंत पिसाळ, वय-२९ वर्षे, धंदा- गृहीणी, रा. फ्लॅट नं. एफ/६०१, ६ वा मजला, सारंग सोसायटी, नांदेड सिटी, सिंहगड रोड, पुणे. |
| ५ | आरोपीचे नाव व पत्ता | सुभद्रा मारूती पवार, वय- ६० वर्षे, धंदा- गृहीणी, रा. भाजी मार्केट, कामगार मैदान, मुंढवा गावठाण, मुंढवा, पुणे(सदर आरोपीस दि. २४/०५/२०१८ रोजी सकाळी ११/०० वा. अटक करण्यात आली आहे. आरोपी पोलीस कस्टडीत) |
| ६ | अपराधाचे ठिकाण | रुबी हॉल हॉस्पीटल शेजारील बसस्टॉपजवळ, पीएपीएमएल बसमध्ये, बंडगार्डन रोड, पुणे |
| ७ | अपराधाचा दि.वेळ | दि. २१/०५/२०१८ रोजी दुपारी ०२/४७ वा. ते दुपारी ०४/०० वा. |
| ८ | अपराध दाखल ता. वेळ | दि. २१/०५/२०१८ रोजी २०/४३ वा. |
| ९ | चोरीस गेलेला माल | एकुण ७५,०००/- रु किमतीचा ऐवज त्यामध्ये अडीच तोळयाचा सोन्याचा गंठन त्याला पानांच्या आकाराचे पदक असलेले, एक तोळयाचे सोन्याचे नेकलेस, एक सोन्याची फुलाच्या आकाराची अंगठी, एक मोटोरोला एक्स प्ले कंपनीचा पांढ-या रंगाचा मोबाईल हॅन्डसेट |
| १० | मिळाला माल | १) एक सोन्याचा गंठन त्याला पानांच्या आकाराचे पदक असलेले<br>२) एक सोन्याचे नेकलेस<br>३) एक सोन्याची फुलाच्या आकाराची अंगठी |
| ११ | बाकी माल | एक मोटोरोला एक्स प्ले कंपनीचा पांढ-या रंगाचा मोबाईल हॅन्डसेट |
| १२ | गु.र.नं. व कलम | ५३/२०१८ भा.द.वि. कलम ३७९ |

**१३) गुन्हयाची हकीकत :-** यातील फिर्यादी यांची फिर्याद की, दि. २१/०५/२१८ रोजी सायं. ०५/४५ वा. वाघेश्वर पॅलेस, वाघोली येथे त्या त्यांच्या आत्याच्या मुलीचे लग्न असल्याने त्यांच्या वर नमुद पत्त्यावरील घरातून दुपारी ०२/३० वा. चे सुमारास त्या व त्यांची आई व मुलगा यांच्यासह निघाले फिर्यादी यांनी वारजे माळवाडी बस स्टॉपवरून सुमारे ०२/४७ ची वारजे माळवाडी ते वाघोली असा प्रवास करत जाणारी पीएमपीएमएल ची बस पकडली. त्यांच्याकडे एक मोठी फुले असलेली निळया रंगाची बॅग होती व त्यामध्ये काही सामान तसेच एक साईड बॅग होती. व त्यामध्ये लग्नात घालण्याकरीताचे सोन्याचे दागिने व त्यांचा मोबाईल होता. फिर्यादी पीएमपीएल बसने पुणे स्टेशन येथुन ससुन रोडने जात असताना रुबी हॉल शेजारील बसस्टॉप येथे त्यांच्या लक्षात आले की, त्यांच्या मोठया बॅगमधील साईड बॅग मध्ये त्यांचे सोन्याचे दागिने तसेच मोबाईल होता. ती बॅग त्यांना दिसली नाही तेव्हाच पीएमपीएमएल बस बसस्टॉपवर थांबली होती तेव्हा लगबगीने दोन महीला बसमधून खाली उतरत होत्या. तसेच फिर्यादी यांच्या असे लक्षात आले की, त्या महीला ज्यावेळी बसमध्ये होत्या तेव्हा त्या गर्दी करून त्यांच्या शेजारी उभ्या राहील्या होत्या. फिर्यादी यांनी त्यांच्या साईड बॅगचा शोध मोठया बॅगमध्ये घेतला परंतू ती मिळून आले नाही. फिर्यादी

यांच्या लक्षात आले की त्यांची बॅग चोरी गेली आहे. त्यादरम्यान बस चालू झाली होती फिर्यदी यांच्या त्यांची बॅग चोरी झाल्याचे लक्षात येताच त्यांनी ताबडतोब बस ड्रायव्हरला बस थांबविण्याकरीता सांगितले परंतू बस थांबेपर्यंत काही वेळ गेला. फिर्यादी व त्यांच्या आईने बसमध्ये बॅगचा शोध घेतला परंतू बॅग मिळून आली नाही. त्यामुळे वरील वर्णनाचे सोन्याची दागिने व मुद्देमाल चोरीस गेल्याने अनोळखी महीलाविरूध्द भा. द. वि. कलम ३७९ अन्वये गुन्हा दाखल असे.

**१४) झालेला तपास :-**

दाखल गुन्हयाच्या अनुषंगाने पो.शि. ८४९५ मंदे, नेमणूक कोरेगाव पार्क पो. स्टे. पुणे यांना बातमीदारामार्फत सदर गुन्हयातील आरोपी महीला या मुंढवा पोलीस स्टेशन हद्दीत असल्याची माहीती मिळाली. सदर माहीती मिळताच म. पोलीस उप-निरीक्षक विद्या राऊत, पो. शि. ८४९५ मंदे, पो. शि. ८५३५ जाधव, पो. शि. १०६३३ सावंत, सर्व नेमणूक कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन यांचेसह खाजगी वाहनाने दाखल गुन्हयातील आरोपी महीलांचा शोध घेणेकामी दि. २४/०५/२०१८ रोजी सकाळी ०७/४५ वा. मुंढवा पोलीस स्टेशन हद्दीत रवाना झालो असता कामगार मैदान चौक, मुंढवा गावठाण, मुंढवा, पुणे येथे् निष्पन्न आरोपी नामे सुभद्रा मारूती पवार, वय- ६० वर्षे, धंदा- गृहीणी, रा. भाजी मार्केट, कामगार मैदान, मुंढवा गावठाण, मुंढवा, पुणे येथे आरोपीताच्या घरी पोहोवून आरोपीस सदर गुन्हयाबाबत व चोरीस गेलेल्या मुद्देमालाबाबत विचारणा केली असता तीने उडवाउडवीची उत्तरे दिल्याने तसेच पोलीसांना संशय आल्याने लागलीच दोन पंचांना सदर ठिकाणी बोलावून आरोपीच्या घराची घरझडती पंचांसमक्ष घेतली असता आरोपीने स्वतः तिच्या घरात असलेल्या पत्र्याच्या कपाटातून गुन्हयात चोरी गेलेल्या मुद्देमालापैकी मोबाइल सोडून सर्व मुद्देमाल काढून दिला पोलीसांनी लागलीच मुद्देमाल जप्त करण्याच्या सामानातील कागदी बॉक्स मध्ये सर्व मुद्देमाल सुरक्षिततेकामी ठेवून तो लाखेच्या सिलने बंद करुन त्यावर पोलीसांच्या व पंचांच्या सहीचे लेबल लावले . तसेच नमूद आरोपीस अटक करुन मा. न्यायालयासमोर रिमांडकामी दाखल केले असता मा. न्यायालयाने दि. २५/०५/२०१८ रोजीपर्यंत आरोपीस पोलीस कस्टडी रिमांड सुनावले आरोपी सध्या पोलीस कस्टडीत, गुन्हयाचा अधिक तपास सुरु.

Pawar V.B

तपासी अंमलदार,
कोरेगाव पार्क पो. स्टे. पुणे